RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष १२, अंक १७] सोमवार, मार्च २३, २०२६/चैत्र २, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ३७**

## प्राधिकृत प्रकाशन

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ मार्च, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना(नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम,२०१७.**

क्र. मदुवआ-१२२५/प्र.क्र.२१३/काम-१०.— महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ६१) याच्या कलम ३७ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) नियम, २०१८ मध्ये सुधारणा करण्याकरिता नियमांचे प्रारूप प्रस्तावित करीत आहे; महाराष्ट्र शासन, याद्वारे, बाधित होण्याचा संभव असलेल्या सर्व लोकांच्या माहितीसाठी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट-कलम (२) द्वारे आवश्यकतेप्रमाणे, महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात उक्त अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सातव्या दिवशी किंवा त्यानंतर, महाराष्ट्र शासन, उक्त प्रारूपात दिलेली नोटीस विचारात घेईल.

**२.** उक्त प्रारूपाच्या बाबतीत कोणत्याही व्यक्तीकडून कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, कामगार भवन, 'ई' ब्लॉक, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे पूर्व, मुंबई-४०० ०५१ येथे किंवा mahalabourcommr@gmail.com या ईमेलद्वारे पूर्वोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी प्राप्त होतील असे कोणतेही आक्षेप किंवा सूचना विचारात घेईल.

**प्रारूप नियम**

क्र. मदुवआ-१२२५/प्र.क्र.२१३/काम-१०.- महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ६१) याच्या कलम ३७ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट-कलम (२) द्वारे आवश्यकतेनुसार पूर्वी प्रसिद्ध केलेले महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) नियम, २०१८ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेः—

**१.** या नियमांस, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवेशर्तींचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२६ असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम, २०१८ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य नियम" असा केला आहे) याच्या नियम-५ मधील, पोट-नियम (२) मध्ये "प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून कार्यालयीन कामकाजाच्या सात दिवसांच्या आत" या मजकुराऐवजी "प्राप्त झाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामकाजाच्या दिवसाच्या आत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**३.** मुख्य नियमांसोबत जोडलेला नमुना अ मधील,-

(क) नोंदी ५, १४, १५ व १७ वगळण्यात येतील;

(ख) नोंद १८ ऐवजी पुढील नोंद दाखल करण्यात येईलः-

| | | | |
|---|---|---|---|
| "१८ | (क) व्यवसाय स्वतःच्या मालकीच्या जागेत केला जातो काय ? | :— | होय/नाही |
| | होय असल्यास, करारानुसार मालकाचे नाव. | | मालकाचे नाव- |
| | (ख) व्यवसाय भाड्याच्या जागेत किंवा भाडेपट्ट्याच्या जागेत केला जातो काय ? | :— | होय/नाही |
| | होय असल्यास, करारानुसार पट्टाकाराचे नाव | | पट्टाकाराचे नाव-" |

**४.** मुख्य नियमांसोबत जोडलेल्या नमुना फ मधील, नोंद १२ वगळण्यात येईल,—

**५.** मुख्य नियमांसोबत जोडलेल्या अनुसूची मधील,—

(क) भाग-अ मधील नोंद (क) मध्ये, पोट-नोंद (४) ऐवजी पुढील पोट-नोंद दाखल करण्यात येईलः—

"(४) आस्थापनेचा पुरावा (खालीलपैकी कोणतेही)

(एक) विक्री/खरेदी विलेख;

(दोन) विद्यमान मत्ता कर प्रदान केल्याची पावती;

(तीन) विद्यमान वीज बिल;

(चार) संस्थेची विद्यमान देखभाल शुल्क पावती;

(पाच) ७/१२ उतारा;

(सहा) स्थानिक प्राधिकरणाद्वारे निर्गमित केलेले ८अ.".

(ख) भाग-क मधील नोंद (ग) मध्ये, पोट-नोंद (२) नंतर पुढील पोट-नोंद जादा दाखल करण्यात येईलः-

"(३) आस्थापनेच्या पत्त्याचा पुरावा (खालीलपैकी कोणताही एक)

(एक) विक्री/खरेदी विलेख;

(दोन) विद्यमान मत्ता कर प्रदान केल्याची पावती;

(तीन) विद्यमान वीज बिल;

(चार) संस्थेची विद्यमान देखभाल शुल्क पावती;

(पाच) ७/१२ उतारा;

(सहा) स्थानिक प्राधिकरणाद्वारे निर्गमित केलेले ८ड.”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रोशनी कदम-पाटील,**
शासनाचे उप सचिव.

## INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 23th March, 2026

*NOTIFICATION*

MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 2017.

No. MSA-1225/C.R.213/Lab-10.- The following draft of rules to amend the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Rules, 2018 which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub- section (*1*) of section 37 of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 (Mah.LXI of 2017) and of all other powers enabling it in this behalf, is hereby published as required by the sub-section (*2*) of section 37 of the said Act, for information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the expiry of seven days from the date of publication of this notification in the *Maharashtra Government Gazette*.

**2.** Any objections or suggestions which may be received by the Commissioner of Labour, Maharashtra State, Kamgar Bhavan, 'E' Block, C- 20, Bandra-Kurla Complex, Bandra East, Mumbai 400 051 or on email mahalabourcommr@gmail.com from any person with respect to the said draft on or before the aforesaid date, will be considered by the Government.

## DRAFT RULES

No. MSA-1225/C.R.213/Lab-10 .- In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 37 of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 (Mah. LXI of 2017), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules to amend the Maharashtra Shops and Establishinents (Regulation of Employment and Conditions of Service), Rules, 2018, the same having been previously published as required by sub-section (*2*) of section 37 of the said Act, as follows, namely:-

**1.** These rules may be called the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) (Amendment) Rules, 2026.

**2.** In rule 5, in sub-rule (2) of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Rules, 2018 (hereinafter referred to as "the principle Rules") for the words "working seven days from the date on which" the words "a working day from the day on which" shall be substituted.

**3.** In Form A appended to the principal Rules,-

(*a*) entries 5, 14, 15 and 17 shall be deleted;

(*b*) for the entry 18 the following entry shall be substituted, namely:-

| | | | |
|---|---|---|---|
| "18 | (A) Is the place of business conducted in owned premises? | :— | Yes/No |
| | If yes, name of the owner as per the agreement | | Name of the owner- |
| | (B) Is the place of business conducted in rental premises in rental premises or leased premises? | :— | Yes/No |
| | If yes, name of the lessor as per the agreement | | Name of the lessor-" |

**4.** In Form F appended to the principal Rules, entry 12 shall be deleted.

**5.** In the SCHEDULE appended to the principal Rules,-

(*a*) in PART-A in entry (A), for sub-entry (4) the following sub-entry shall be substituted, namely:-

"(4) Proof of establishment (any of the following):-

(*i*) Sale/Purchase Deed;

(*ii*) Current Property Tax paid Receipt;

(*iii*) Current Electricity Bill;

(*iv*) Current Society Maintenance Receipt;

(*v*) 7/12 Extract;

(*vi*) 8A issued by Local Authority.".

(*b*) in PART-C, in entry (C), after sub-entry (2), the following sub-entry shall be added, namely:-

"(3) Proof of establishment Address (any one of the following):-

(*i*) Sale/Purchase Deed;

(*ii*) Current Property Tax paid Receipt;

(*iii*) Current Electricity Bill;

(*iv*) Current Society Maintenance Receipt;

(*v*) 7/12 Extract;

(*vi*) 8-D issued by Local Authority.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ROSHANI KADAM-PATIL,
Deputy Secretary to Government

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.